ISSN 2394-5303

# Printing Area ®

Issue-64, Vol-01 April-2020

Peer Reviewed International Refereed Research Journal



Editor

Dr.Bapu G.Gholap

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

April-2020, Issue-64, Vol-01

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) The Charismatic Leadership nature of Banngabandhu Sheikh Mujibur ...
**Md. Shah Alam & Dr. Mozammel Haque, Uttar Dinajpur, West Bengal** ||67

15) WOMEN EMPOWERMENT IN INDIA
**Nisarg D. Upadhyay, Patan** ||71

16) Impact of Health education through proper nutrition for sport performance
**Prof. Dr. Nirajsingh F. Yadav, Dist-Nagpur** ||74

17) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या विकासासाठी केलेले योगदान
**सहायक प्रा. राहुल केदारनाथ बोरसे, जि. औरंगाबाद** ||77

18) राज्याचे राजकारण आणि राज्यपाल
**डॉ. डोंगरे एल. बी., जि. नांदेड** ||80

19) सुधारित नागरिकत्व कायदा आणि भारतीय राजकारण: एक परिक्षण
**प्रा. राजेश कचरु गायकवाड, जि. बीड** ||82

20) 'हाल्या हाल्या दुधू दे' मधील सावकारी पाश व भ्रष्ट सरकारी यंत्रणेचे चित्रण
**डॉ. सुभाष ज्ञानबा गव्हाणे, चिखली** ||86

21) चिपको आंदोलनातील महिलांचा लढा
**प्रा.डॉ. नीता जगताप, पुणे** ||91

22) भारतीय रिझर्व्ह बँक : इतिहास व कार्य
**प्रा. माणिकराव मा. कवरके, जि. अकोला** ||94

23) मध्ययुगीन कालखंडातील अधिका-याची कार्य प्रणाली
**डॉ. पी. बी. सिरसट, जि. बीड** ||98

24) हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण वस्ती आणि लोकसंख्याच्या वितरणाचा भौगोलिक अभ्यास
**डॉ. एस. व्ही. ताठे, जि. जालना** ||101

25) लोणार परिसरातील मठ, मंदिरे, शिल्प यांचे महत्व व स्थान
**डॉ. सुधाकर एन. वाघ, जालना** ||104

26) आदिवासी भिल्ल समाज आणि त्यांची मौखिक गिते
**डॉ. भास्कर गायकवाड, जि. लातूर** ||107

www.vidyawarta.com/03 _ http://www.printingarea.blogspot.com

ISSN: 2394 5303 | Impact Factor 7.387(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | April 2020 Issue-64, Vol-01 | 0107

26

# आदिवासी भिल्ल समाज आणि त्यांची मौखिक गिते

डॉ. भास्कर गायकवाड
महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा, जि. लातूर

************

प्रस्तावना:—

आदिवासी भिल्ल समाज हा महाराष्ट्रातील अनु—जमातीपैकी एक जमात—आदिवासींची लोकगीते ही त्यांच्या संस्कृतीवर प्रकाश टाकणारी आहेत.लोकगीते ही एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असतात. मराठी साहित्यात लोकसाहित्याला अत्यंत महत्वाचे स्थान आहे.संशोधन म्हणजे अपरीचीत, अप्रसिध्द, असंशोधित असा भाग असतो. लोक साहित्य संशोधनाच्या संदर्भात संकलन आणि संशोधनला महत्व आहे. आणि हे लोकसाहित्याचे संकलन जर आदिवासी समाजाच्या संदर्भात असेल तर, त्यासाठी पराकाष्टा करावीच लागते.आदिवासींच्या लोकांशी संपर्क साधून, त्यांच्या लोकजिवनाशी समरस होवून, मौखिक परंपरेचे संदर्भ तपासून पहावे लागतात. त्याशिवाय निष्कर्ष मांडता येत नाहीत. अलिकडे आदिवासींच्या मौखिक गीतांकडे, त्यांच्या संस्कृती परंपरांचा शोध घेण्याचे होत असलेले प्रयत्न गौरवास्पद आहेत. खरे तर आदिवासी लोकसाहित्याकडे अभ्यासकांचे लक्ष फारच उशिरा गेले असेच म्हणावे लागेल. महाराष्ट्रात आदिवासींच्या भिन्न भिन्न जाती आहेत, त्यांच्या स्वतंत्र अशा संस्कृती आहेत. विविध प्रकारची लोकगीते आहेत.त्यातून त्यांची परंपरा, संस्कृती, रितीरिवाज, भाषा, कौटुंबिक जिवन, सामाजिक, सांस्कृतिक, ऐतेहासिक दाखले मिळतात. ते शोधण्याचा प्राजंळ प्रयत्न्या शोधनिबंधाव्दारे केलेला आहे. यातून नोंदविलेले निष्कर्ष हे अंतिम आहेत असे नाही.

भारतातील आदिवासी समाजाचे जे प्रमुख गट आहेत त्यात गोंड, मुंडा व भिल्ल हे महत्वाचे गट आहेत. भिल्ल आदिवासी मध्यप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात व राजस्थान या चार प्रांतात पसरले आहेत. त्यांची नेमकी संख्या कीती आहे हे सांगणे कठीण असले तरीही ती सुमारे दोन कोटीच्या वर असावी असे वेगवेगळया खानेसुमारीच्या आकडेवारीवरुन वाटते. भारतातल्या कीतीतरी छोटयाछोटया राज्यांच्या लोकसंख्येपेक्षा भिल्लांची संख्या नक्कीच जास्त आहे. असे असूनही राष्ट्राच्या जीवनाच्या कोणत्याही पैलुवर भिल्ल संस्कृतीची काही विशेष छाप पडलेली आहे.. . भिल्ल संस्कृती किती प्राचिन आहे, हे नक्की सांगता येणे कठीण आहे. पण एवढे मात्र निश्चित की, महाभारतातील समाजात भिल्ललोकांचा समावेश होता. ते कोठून आले, का मुलत: ते याच देशात होते याविष्यी अजून कोणतेच संशोधन झालेले नाही. १. अलिकडे आदिवासींची संस्कृती समजून घेण्यासाठी संशोधन सुरू झालेले आहे. विविध अभ्यासकांनी यावर आपले संशोधन ग्रंथरूपाने प्रकाशीतही केलेले आहे. डॉ.गोविंद गारे, मा.वहारुदादा सोनवणे, डॉ.विनायक तुमराम, डॉ.माहेश्वरी गावित, यासारख्या अभ्यासकांनी अभ्यासपूर्ण मांडणी वाचकांसमोर ठेवलेली आहे.

लोकगीत, मौखिक गीत हे लोकसाहित्याचे एक महत्वपूर्ण अंग आहे.महाराष्ट्रात लोकसाहित्याला असलेले महत्व्सर्वश्रुत आहे.लोकसाहित्याचे संकलन आणि त्यासंबधीचे लेखन याला १८५८ पासूनच सुरवात झालेली आहे.लोकसाहित्याचे हे संकलन म्हणजे एक समृध्दीने नटलेले व आणि वैविध्यपूर्ण परंपरा आहे. माणसाच्या जन्मापासून तर मृत्यूपर्यंत जे प्रमुख धर्मविधी वा संस्कार आहेत,त्याप्रसंगी विविध भाषा वा समाजामध्ये लोकगीते पहावयास मिळतात. ऋग्वेदात मृत्यूप्रसंगी म्हणवयाची सुक्ते आहेत. गुप्तपूर्व काळातील काही भारतीय लोकगीते चिनी भाषांतराच्या रुपाने पहावयास मिळतात. असा उल्लेख ए.एल.बाशम यांनी त्यांच्या द वंडर दॅट वॉज इंडिया या ग्रंथात करून ठेवला आहे. लोकगीतातूनच समाजजीवन, लोकजीवन, लोकसंस्कृती याचे दर्शन घडते, म्हणून लोकगीत हा लोकसाहित्याचा आत्मा आहे.वेगवेगळया समाजात ही मौखिक गीते आपले अस्तीत्व आजही टिकवून आहेत.

इकाला रामा,
खांदावर धोंगडी फिरीर वना नगरी
ना भेटनी याला सुंदरी, सुंदरी रामा
नको देऊ वडेल गावला, गावला रामा
हातमं नळी डोकावर डबडा लाई दिई दारु गाळाला
गाळाला रामा,
खांदावर धोंगडी फिरीर वना नगरी
ना भेटनी याला सुंदरी, सुंदरी रामा
नको देऊ उमराणा गावला, गावला रामा
हातमं गोणटी डोकावर पाटी लाई दिई कांदडा भराला,
भराला रामा,
खांदावर धोंगडी फिरीर वना नगरी
ना भेटनी याला सुंदरी, सुंदरी रामा
नको देऊ गिरणा डॅमला, डॅमला रामा
हातमं आवल्या डोकावर जाळा लाई दिई मासाधराला,
धराला रामा,
खांदावर धोंगडी फिरीर वना नगरी
ना भेटनी याला सुंदरी, सुंदरी रामा. ५

हे लोकगीत फक्तगीतच नाही तर गावांच्या नांवाबरोबर त्या गावातील व्यवसाय सुध्दा कळतात. त्यांचे जीवन जगणे कळते.

डॉ.प्रकाश आमटे यांनी आपल्या मुलाखती दरम्यान आदिवासीकडून कोणते गुण शिकावेत याबदल सांगितले आहे, ते म्हणतात, आदिवासी समाज अल्पसंतुष्ट आहे.ते कधीच चोऱ्या करीत नाही.उपाशी किंवा अर्धपोटी राहतील पण भिक मागणार नाहीत. त्यांच्यात बलात्काराच्या घटना नाहीत. आदिवासी बांधव अतिशय सहनशिल आणि काटक असतात. गावातील समस्या गावात सोडविण्यावर त्यांचा भर असतो. गावाचे निर्णय सर्व गावकरी मिळून घेत असतात. त्यांच्यातील या गुणवैशिष्टयांचा इतर समाजाने बोध घ्यावा असेही डॉ.आमटे यांना वाटते.

**निष्कर्ष:—**

०१) आदिवासी भिल्लांचे जीवन हे अत्यंत साधे आणि मनमिळाऊ आहे.

०२) उपलब्धअसलेल्या साधनांमध्ये ते समाधान मानतात. यामुळे ते नेहमीच आनंदी राहतात. उदयाचा विचार न करता आज आपल्याला काय मिळते यावरच त्यांचा भर असतो. म्हणूनच अधिक साठवणुकीचा विचार ते करीत नाहीत.

०३) परिवर्तन स्विकारतात पण अंथरुन पाहून पाय पसरतात.

०४) जमिनीचे अंथरुन आणि आकाशाचे पांघरुन यालाच ते महत्व देतात.

०५) संगीत आणि नृत्याला आदिवासी भिल्लांमध्ये महत्वाचे स्थान आहे.

०६) सुखात दुखात दारुला महत्व असले तरी अलीकडे हे प्रमाण कमी झालेले आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची:—**

१.गणेश देवी वानप्रस्थ पदमगंधा प्रकाशन, पुणे, २००७ पृ क्र.८८
२.डॉ.गायकवाड भास्कर आदिवासी भिल्ली लोकगीते अपूर्वा प्रकाशन, परभणी, २००८ पृ क्र.३१.
३.डॉ.गायकवाड भास्कर आदिवासी भिल्ली लोकगीते अपूर्वा प्रकाशन, परभणी, २००८ पृ क्र.२२.
४.डॉ.गायकवाड भास्कर आदिवासी भिल्ली लोकगीते अपूर्वा प्रकाशन, परभणी, २००८पृ.क्र १४
५.डॉ.गायकवाड भास्कर आदिवासी भिल्ली लोकगीते अपूर्वा प्रकाशन, परभणी, २००८ पृ क्र ०६

❑❑❑